# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

## महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१.
WWW.DVET.GOV.IN e-mail: dk12_dvet@YAHOO.COM Fax- 22659235/22675628 Phone No. 22620604/293.

BOOK POST
O.I.G.S.

D-12-

क्रमांक :- १२/अशा.औ.प्र.सं(२)/३९

दिनांक :- ०८/०४/२०११

आस्था / लेखा / प्रशिक्षण /
अनुदान / भांडार / शिप्रयो.
सहसंचालक
आवक क्र. 900 दिनांक

18/4/2011

प्रति,
अध्यक्ष / प्राचार्य,
परशूराम बालाजी पाटील औ.प्र.केंद्र,
मुदाळ, गट नं. १५९,
पो. मुदाळ, ता. भुदरगड,
जि. कोल्हापूर

**विषय :- विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवीन/व्यवसाय / जादा तुकड्यांना परवानगी देणेबाबत...**

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यांत येते की, शासन निर्णय क्र. **आयटीआय-२०११/प्र.क्र.११/व्यशि-३, दि. २५ मार्च, २०११** अन्वये खालील नवीन व्यवसाय / तुकड्या सुरु करण्यांस अटींच्या अधीन राहून परवानगी दिलेली आहे.

१) मंजूर केलेल्या नवीन व्यवसाय / जादा तुकड्यांसाठी संस्थेने आवश्यक त्या बाबींचे केंद्र शासनाच्या ट्रेनिंग म्यॅन्युअल मधील मानकानुसार १००% पूर्तता करुन संस्थेचे स्थायी समितीतर्फे / स्थानिक स्थायी समितीतर्फे (DIR) निरीक्षण करण्यांत येईल. तत्पूर्वी ३० एप्रिल,२०११ पुर्वी नवीन व्यवसायासाठी पूर्व निरीक्षण अहवाल (संबंधित व्यवसायाच्या दोन्ही तुकडयांचा एकत्रित) सहसचांलक यांचेमार्फत संचालनालयास सादर करण्यांत यावा. तद्नंतर स्थायी समितीचे निरीक्षण लावण्यांत येईल.

२) संलग्नता प्राप्त झाल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत संस्थेस नव्याने परवानगी मिळालेल्या नवीन व्यवसाय / जादा तुकड्यात प्रवेश करु नयेत.

३) संस्थेचे स्थायी समिती निरिक्षण / स्थानिक स्थायी समिती निरिक्षणापूर्वी शासन निर्णय क्र. पीटीआय-१०००/२४६/व्यशि-१, दि.१५ एप्रिल,२००२ अन्वये दिलेल्या आदेशानुसार प्रति व्यवसाय प्रति तुकडी रु.१०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) एवढी अनामत रक्कम संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,मुंबई- ४०० ००१ यांचे नांवे धनाकर्ष संचालनालयास जमा केल्यानंतरच तसेच संलग्नता प्राप्त झाल्यावर प्रत्यक्ष प्रवेशास संचालनालयाकडून स्वतंत्र परवानगी देण्यांत येईल तद्पूर्वी प्रवेश देण्यांत येऊ नयेत.

४) डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांच्या सूचनेप्रमाणे संलग्नता प्राप्त नसतांना विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत असे प्रवेश दिल्यास प्रवेशित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परीषदेच्या परिक्षेस बंसण्यांची परवानगी देण्यांत येणार नाही. व परिक्षा घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील याची संस्थेने नोंद घ्यावी.

५) या व्यतिरिक्त शासनाकडून / व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचेकडून वेळोवेळी निर्गमित करण्यांत आलेल्या शासन निर्णयाचे / आदेशांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) शासनाने / संचालनालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे संस्थेने पालन करणे आवश्यक असून प्रवेश, निरीक्षण, संलग्नता, प्रशिक्षण इ. बाबत कोणत्याही स्वरुपाची अनियमितता आढळल्यास संस्थेस दिलेल्या नवीन व्यवसाय / जादा तुकडीची परवागनी रद्द करण्यांत येईल.

७) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व राज्य शासनाने / संचालनालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे/ निदेशांचे पालन न केल्यास किंवा प्रवेश / संलग्नता / परीक्षा इ. बाबत कोणत्याही स्वरुपाची अनियमितता केल्यास संस्थेस दिलेल्या नवीन व्यवसाय / जादा तुकड्यांची परवानगी तात्काळ रद्द करण्यांत येईल.

८) तसेच डि.जी.ई.टी., नवी दिल्ली व संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

२५३८
२-५-११